# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### वरिष्ठ महाविद्यालयातील रिक्त पदे भरणेबाबत

**(१) १३१२० (२९-०४-२०२२) श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयास नॅक मुल्यांकनामध्ये चांगला दर्जा प्राप्त होण्यासाठी शासन प्रयत्नशील असून मुलांना मिळणारे शिक्षण उच्च दर्जाचे असावे असा शासनाचा प्रयत्न आहे, परंतु बहुंताशी महाविद्यालयामध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याने पूर्णवेळ शिक्षकांच्या किती जागा रिक्त आहेत, याची अद्ययावत आकडेवारी शासनाकडे काय आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रिक्त जागा भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२६-०९-२०२२) :** (१) दिनांक ०१/१०/२०१७ च्या विद्यार्थीसंख्येनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या ११७१ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत सहाय्यक प्राध्यपकांच्या अनुज्ञेय ३११८५ पदांपैकी २२२३६ पदे भरलेली असून ८९४९ पदे रिक्त आहेत. तसेच माहे मार्च २०२०-२१ अखेर १२ व ३ अभिमत विद्यापीठे अशा एकदरीत १५ विद्यापीठांमध्ये एकूण २६०० शिक्षकीय पदे मंजूर असून १३२९ पदे भरलेली आहेत व १२७१ पदे रिक्त आहेत.

(२) राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेल्या शिक्षकीय पदांपैकी ४० टक्के म्हणजेच ३५८० पदे भरण्यास उच्च स्तरिय सचिव समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार दिनांक ०३/११/२०१८ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून पदभरतीची प्रक्रिया सुरु होती.

परंतु कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर पदभरतीवर निर्बंध जारी करण्यात आल्याने सदर पदभरतीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. मात्र अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील दैनंदिन प्रशासकीय व शैक्षणिक कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी तसेच राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती प्रमाणिकरण (NAAC) मिळण्याकरीता वित्त विभागाचे पदभरतीचे निर्बंध शिथिल करून उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १२/११/२०२१ च्या आदेशान्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्य

संवर्गातील १०० टक्के पदे आणि सहाय्यक प्राध्यापकांची उर्वरित २०८८ रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यानुसार सद्य:स्थितीत सुधारित आरक्षण धोरणानुसार तपासणी करुन पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कोका-कोला कंपनीतील कामगारांच्या समस्यांबाबत

**(२) १३१३७ (३०-०३-२०२२) श्री.राजहंस सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कोका-कोला कंपनीचे व्यवस्थापन व ठेकेदार यांच्या मनमानी कारभाराविरोधात कामगार संघटनेने तहसिल कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुडुस ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या कोका-कोला या शितपेय बनवणाऱ्या कंपनीतील कामगार गेल्या अनेक वर्षापासून काम करीत असून ठेकेदाराकडून त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे पैसे भरले जात नसून वेळेवर पगार दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामगारांना वेळेवर पगार मिळण्याबाबत व त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे पैसे भरण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१९-१०-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) स्थानिक कामगार संघ आणि ठेकेदार यांच्यामध्ये सन २०१७ ते २०२१ दरम्यान कामगारांच्या वेतन वाढीचा करार झाला होता. सदर वेतन वाढीचे पैसे सन २०२० मध्ये कामगारांच्या खात्यात जमा करण्यात आले होते. तथापि, वेतनवाढीच्या रकमेवरील भविष्य निर्वाह निधीचे पैसे एकूण रुपये ९,२५,९०७/- भरावयाचे बाकी होते. समर्थ कामगार संघटना आणि ठेकेदार यांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे तीन टप्प्यात सदरची पूर्ण रक्कम भरणा केली आहे. तसेच कामगारांच्या प्रत्येक महिन्याच्या वेतनावरील भविष्य निर्वाह निधी भरणा केला आहे. जानेवारी, २०२२ ची भविष्य निर्वाह निधीची रक्कम सुध्दा भरण्यात आली असल्याचे कंत्राटदार मे. धनंजय इंटरप्रायझेस यांनी कळविले आहे.

तसेच, कामगारांचे माहे नोव्हेंबर २०२१, डिसेंबर २०२१ व जानेवारी २०२२ चे वेतन कामगारांना अदा केल्याचे मे.धनंजय इंटरप्रायझेस यांनी कळविले आहे. कंत्राटी कामगारांचे वेतन निर्धारित वेळेत न दिल्याने, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अन्वये कंत्राटदार मे. राज लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेविरुध्द खटला क्र. ७९/२०२२ व मे. धनंजय एंटरप्रायझेस यांचेविरुध्द खटला क्र. ८०/२०२२ दाखल करण्यात आला आहे. कंपनी व्यवस्थापनाने दिनांक २९/०६/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे कंत्राटी कामगारांचे माहे मे, २०२२ चे वेतन अदा केले असून मे, २०२२ च्या वेतनातून कपात केलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम संबंधित खात्याकडे जमा केली आहे. तसेच यापूर्वीचे कोणतेही वेतन व भविष्य निर्वाह निधीची रक्कम बाकी नसल्याचे कळविले आहे.

(३) महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेने दाखल केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने (भविष्य निर्वाह निधी, पगार इत्यादी) कामगार उप आयुक्त, पालघर कार्यालयाने दिनांक २८/१२/२०२१ व दिनांक ०३/०१/२०२२ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या. तसेच तहसिलदार वाडा कार्यालयामध्ये अर्जदार संघटना, व्यवस्थापन व कंत्राटदार यांच्यामध्ये दिनांक ०७/०१/२०२२ रोजी कामगार उप आयुक्त, पालघर कार्यालयाने बैठकीचे आयोजन केले होते. दिनांक ०७/०१/२०२२ रोजी तहसिलदार वाडा कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीमध्ये उभयतांमध्ये समझोता झाल्यामुळे संघटनेने दिनांक ०५/०१/२०२२ पासून सुरू केलेले आमरण उपोषण दिनांक ०७/०१/२०२२ रोजी मागे घेण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण (पूर्व) येथील विविध रस्त्याची व आरक्षित जागा ताब्यात घेण्याबाबत

**(३) १३२०१ (३०-०३-२०२२) श्री.रमेश कराड, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व)(जि.ठाणे) येथील सिध्दार्थ नगर ते तिसगांव नाका, कोळसेवाडी ते काटेमानेवली तसेच विजयनगर आमराई ते चेतना स्कूल पर्यंत रस्ता रुंदीकरण करणे, श्रीमलंग रोड ते चिंचपाडा या १०० फुटी रोडमध्ये बाधित होणाऱ्या माधव अपार्टमेंट व इतर बांधकामधारकांचे पुनर्वसन करून रस्त्यांचे काम सुरु करणे तसेच १०० फुटी रोड लगत रुग्णालयाकरीता (आरक्षण क्र.२८३) ३०,००० चौ.मी. आरक्षित जागेवर सुसज्य असे रुग्णालय व क्रीडा संकुल तसेच गार्डन याकरीता आरक्षित जागा ताब्यात घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.नगरविकास मंत्री, मा.नगरविकास राज्यमंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे व आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कल्याण (पूर्व) येथील रस्ता रुंदीकरण, नवीन रस्ता तयार करणे तसेच इतर विकास कामाकरीता आरक्षित भूखंड ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-११-२०२२) :** (१) अशा आशयाची निवेदने श्री.गणपत गायकवाड, मा.विधानसभा सदस्य यांनी दिनांक ०९/०६/२०२१, दिनांक २२/०७/२०२१ व दिनांक ०२/०१/२०२२ रोजी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे केली, हे खरे आहे.

(२)
- कल्याण विभागातील सिध्दार्थ नगर ते तिसगांव नाका, कोळसेवाडी ते काटेमानिवली हे रस्ते महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार १२.०० मी. व १५.०० मी. रूंद करणेकरीता महानगरपालिका स्तरावरील कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
- विजयनगर आमराई ते चेतना स्कूल हा १८ मी. रूंदीचा रस्ता सद्य:स्थितीमध्ये २० टक्के विकसित झालेला आहे.
- श्रीमलंग रोड ते चिंचपाडा रोडच्या जंक्शनवर माधव अपार्टमेंट ही महापालिकेच्या विकास योजनेपुर्वीची इमारत बाधित होत आहे.

- सदर इमारतीतील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात येत असून सदर कार्यवाही केल्यानंतर उर्वरित भाग विकसित करण्यात येणार आहे.
- आरक्षण क्र. २८३ “रूग्णालय” या आरक्षणाची जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत संबंधित जमीन मालकांना नोटीस देण्यात आली असून आरक्षणाची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
- आरक्षण क्र.२७९ “क्रीडासंकुल” या आरक्षणाचे क्षेत्र ३९२०० चौ.मी. एवढे असून त्यापैकी १३४६० चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.
- उर्वरित जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत संबंधित जमीन मालकांना नोटीस देण्यात आलेली आहे. सदर आरक्षणाचे ४००६ चौ.मी. क्षेत्र हस्तांतरणीय विकास हक्काच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील उपजिल्हाधिकारी यांना अपर जिल्हाधिकारी पदावर बढती देण्याबाबत

**(४) १३२२८ (३०-०३-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकाच पदावर १८ ते २० वर्षापासून सेवा देणाऱ्या ८५ उपजिल्हाधिकांऱ्यांना अप्पर जिल्हाधिकारी पदावर अद्याप पदोन्नती मिळाली नसल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे तातडीने भरायची आहेत असे शपथपत्र शासनाने मा.न्यायालयात देऊनही अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन सदर उपजिल्हाधिकारी यांना बढती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२०-१०-२०२२) :** (१), (२), व (३) उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची दिनांक ०१/०१/१९९९ ते दिनांक ३१/१२/२००३ या कालावधीची व दिनांक ३१/१२/२०२० च्या अंतिम ज्येष्ठतासूचीस मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र. २६१२/२०२१ व क्र. ४९०८/२०२१ अन्वये आव्हानित करण्यात आले होते.

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक १०/०२/२०२१ च्या आदेशान्वये सदर ज्येष्ठतासूची संदर्भात “जैसे थे” (Status Quo) ठेवण्याबाबत निर्देश दिले होते. तद्नंतर, मा.न्यायाधिकरणाने दिनांक १७/०३/२०२१ च्या आदेशान्वये, सदर दोन्ही याचिका महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांचेकडे वर्ग करुन “जैसे थे” (Status Quo) ३ आठवड्यांकरीता कायम ठेवली होती.

सदर ज्येष्ठतासूचीसंदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे देखील मूळ अर्ज २३६/२०२१ व २३७/२०२१ अन्वये आव्हानित करण्यात असून दिनांक २७/०७/२०२१ रोजी अर्जदाराची अंतरिम स्थगिती (Interim Relief) देण्याची विनंती न्यायालयाने नाकारली आहे.

महसूल संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने या विभागाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद खंडपीठ येथे संकीर्ण अर्ज क्र. ३०५/२०२१ दाखल केला होता. सदर याचिकांमध्ये मा.न्यायाधिकरणाने दिनांक १७/१२/२०२१ रोजी दिलेल्या स्थगिती आदेशामध्ये सुधारणा करुन अपर जिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यास परवानगी दिली आहे. त्यास अनुलक्षून, उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी या पदावर शासन आदेश, दिनांक १८/०८/२०२२ अन्वये, पदोन्नती देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथील जुने व जीर्ण झालेल्या ऑक्सिजन पाईपलाईन बदलून नवीन ऑक्सिजन पाईपलाईन टाकण्याबाबत

**(५) १३२५९ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे सद्य:स्थितीत २० मेट्रीक टनचे २ लिक्वीड ऑक्सिजन प्लांट व हवेतून ऑक्सिजन शोषून घेणारे ३ पीएसए प्लांट कार्यान्वित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील काही ऑक्सिजन पाईपलाईन ह्या फार जुन्या व जीर्ण झाल्या असल्याने व नव्याने टाकण्यात आलेली पाईपलाईन नियोजनबध्द रितीने न टाकण्यात आल्याने दुर्घटना होऊन जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली असून शनिवार दिनांक १५ जानेवारी २०२२ रोजी मुख्य ऑक्सिजन पाईपलाईन फुटून ऑक्सिजन गळती होण्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दुर्घटनेची शासनाने चौकशी करून भविष्यातील मोठी दुर्घटना टाळण्याकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथील जुने व जीर्ण झालेल्या ऑक्सिजन पाईपलाईन बदलून नवीन ऑक्सिजन पाईपलाईन नियोजनबध्द रितीने टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१४-१०-२०२२) :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी ऑक्सिजन पाईप लाईनचे काम सुरु असताना ऑक्सिजन गळतीची घटना घडली होती.

(३) व (४) सदर संस्थेस नवीन ऑक्सिजन पाईपलाईन बसविण्यात आलेली आहे.

---

## हिंगोली जिल्ह्यातील खरबी, हिंगोली, दुर्गधामणी, समगा व टाकळगव्हाण ह्या कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६) १३४५८ (३०-०३-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील रुपये २८ कोटींची मंजुरी असलेल्या खरबी, हिंगोली, दुर्गधामणी, समगा व टाकळगव्हाण ह्या कोल्हापूरी पध्दतीचे बंधाऱ्याचे काम मागील तीन वर्षापासून सुरु असून अद्यापि काम पूर्ण करण्यात आले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बंधाऱ्याची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०७-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) खरबी, हिंगोली, दुर्गधामणी, समगा व टाकळगव्हाण या कामांना जलसंधारण महामंडळांतर्गत प्र.मा. प्राप्त असून कार्यारंभ आदेश दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी निर्गमित आहेत. कोविड-१९ साथरोग प्रादुर्भाव व जानेवारी, २०२० पर्यंत कयाधु नदीतील पाणी प्रवाह यामुळे कामे पूर्ण करण्यास विलंब झाला. सध्या हिंगोली, दुर्गधामणी, समगा व टाकळगव्हाण बांधकामे जोता पातळी पर्यंत पूर्ण करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रोजगार हमी योजनेंतर्गत मजूर व इमारत बांधकाम मजूरांना निकृष्ट आहार मिळत असल्याबाबत

**(७) १३४८८ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेंतर्गत मजूर व इमारत बांधकाम मजूरांना शासनाद्वारे निःशुल्क आहार पुरवठा केला जातो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यामधील विविध ग्रामपंचायती अंतर्गत सुरू असलेल्या रो.ह.यो. कामातील व इतर इमारत बांधकामातील मजूरांना निकृष्ट दर्जाचा आहार मिळत असून ग्रामपंचायत रेवराळ व निसतखेडा सह काही ग्रामपंचायत सरपंचानी हा आहार घेणे नाकारले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित निकृष्ट आहार देणाऱ्या पुरवठादारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२०-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.

तथापि, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदित व अनोंदित बांधकाम कामगारांना कामाच्या कार्यस्थळी अटल आहार योजनेंतर्गत नि:शुल्क आहार पुरवठा केला जातो.

(२) हे खरे नाही.

मौदा तालुक्यातील विविध ग्रामपंचायती अंतर्गत सुरु असलेल्या रोजगार हमी योजनेच्या कामातील व इतर इमारत बांधकामातील मजूरांना निकृष्ट दर्जाचा आहार मिळत असल्याने ग्रामपंचायत रेवराळ व निसतखेडा सह काही ग्रामपंचायत सरपंचांनी हा आहार घेणे नाकारल्याबाबत कोणतीही तोंडी किंवा लेखी तक्रार प्राप्त झाली नसल्याचे कार्यालयीन अभिलेखावरुन आढळून आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेच्या हिवताप व हत्तीरोग विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) १३४९४ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या हिवताप विभागातील ४० टक्के व हत्तीरोग विभागातील ४९ टक्के पदे रिक्त असल्यामुळे महानगरपालिकेच्या हद्दीत गत तीन वर्षामधील सन २०२१ मध्ये सर्वाधिक डेंग्यु रुग्ण आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिवताप व हत्तीरोग साथीच्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०९-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे. वर्ष २०१९ व २०२० च्या तुलनेत २०२१ मध्ये डेंग्युचे रुग्ण जास्त प्रमाणात आढळून आले. डेंग्युचा प्रसार एजंट, होस्ट आणि एनवायरमेन्ट या तीन बाबींवर अवलंबून असतो. त्यामुळे सदर रिक्त पदांमुळे डेंग्युचे रुग्ण सर्वाधिक आढळून आले नाही.

(२) व (३) सदर रिक्त पदांच्या भरतीकरीता नागपूर महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच स्वच्छता विभागातील कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात हिवताप व हत्तीरोग विभागात काम करत असून हिवताप, डेंग्यु व हत्तीरोग साथीच्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-ब संयुक्त पूर्ण परीक्षा मधील सर्व उमेदवारांना मुख्य परिक्षेला बसण्याची संधी मिळणेबाबत

**(९) १३४९६ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अंतर्गत गट-ब (एस.टी.आय/ पी.एस.आय/ एस.ओ.) पदांच्या संयुक्त पूर्व परीक्षा २०२० मध्ये चुकीची उत्तरतालीका जाहीर केली गेली व ही चुक लक्षात आल्यानंतर उत्तरात दुरुस्ती न करता ते प्रश्नच रद्द करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयोगाच्या या निर्णयामुळे सुमारे ३००० उमेदवारांचे नुकसान झाले व या विरोधात यातील काही विद्यार्थ्यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात व काही विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय लवादा मध्ये दाद मागितली असता त्यांना मुख्य परिक्षेला बसण्याची परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक उमेदवारांची न्यायालयात जाण्याची आर्थिक स्थिती नसल्याने व आयोगाचा चुकीच्या निर्णयामुळे होतकरु उमेदवारांचे नुकसान होऊ नये याकरीता या परीक्षा प्रकरणातील सरसकट सर्व विद्यार्थ्यांना मुख्य परिक्षेला बसण्याची संधी शासन उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

प्रश्न रद्द करण्यासंदर्भात आयोगाच्या कार्यनियमावलीत विहित तरतुदीनुसार सदर प्रकरणी प्रश्न रद्द करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सांविधानिकदृष्ट्या स्वायत्त संस्था असून आयोगामार्फत परीक्षा प्रक्रिया राबविण्याबाबत धोरण ठरविले जाते व त्यानुसार उमेदवारांना परीक्षेला बसण्याची संधी आयोग उपलब्ध करुन देतो. त्यामध्ये शासन स्तरावरुन कोणताही निर्णय घेण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील शासकीय धान खरेदी केन्द्रावर परप्रांतातील धान विक्री होत असल्याबाबत

**(१०) १३४९७ (३०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने बाजार समितीच्या (मार्केटींग फेडरेशनच्या) माध्यमातून नागपूर जिल्ह्यात विविध ठिकाणी शासकीय धान खरेदी केंद्रे सुरू केलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धान खरेदी केंद्रावर परप्रांतीय धान खरेदीस प्रतिबंध असूनही काही खरेदी केंद्रावर परप्रांतीय धान विक्री करण्याचे गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, किती खरेदी केंद्रावर परप्रांतीय धान खरेदी गैरव्यवहार झालेआहेत तसेच नागपूर खरेदी केन्द्राच्या कर्मचाऱ्यांचा यात सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नागपूर जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रावर परप्रांतीय धान खरेदीबाबतच्या गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (३०-०९-२०२२) :** (१) हे खरे आहे.

खरीप पणन हंगाम २०२१-२२ मध्ये नागपूर जिल्ह्यात मार्केटिंग फेडरेशन अधिनस्त १२ सब एजन्ट संस्थांमार्फत २४ खरेदी केंद्रांवर ३६३१३५.३९ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

मौजा डुमरी, ता.पारशिवनी (जि.नागपूर) येथील शेतकी खरेदी विक्री संस्था मर्या., पारशिवणी या धान खरेदी केंद्रावर दिनांक २८/०१/२०२२ रोजी गुप्त माहितीच्या आधारे केंद्र तपासणीसाठी जिल्हा मार्केटिंग अधिकारी नागपूर, तहसिलदार पारशिवनी व कृषी अधिकारी घटनास्थळी पोहोचले असता, सदर केंद्रावर उत्तर प्रदेश पासिंगचा ट्रक क्र.UP७२AT ३१८८ मधील ५६ पोती हमालांनी डुमरी खरेदी केंद्रावर उतरविली असल्याचे निर्दशनास आले. सदर ट्रक ताब्यात घेवून पोलीस स्टेशन कन्हान यांचे ताब्यात देण्यात आला.

(३) नागपूर जिल्ह्यामध्ये मौजा डुमरी, ता.पारशिवणी येथील शेतकी खरेदी विक्री संस्था मर्यादित पारशिवणी या एकाच धान खरेदी केंद्रावर गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्याने सदर केंद्रास नोटीस बजावण्यात आली असून यामध्ये कोणत्याही कर्मचाऱ्याचा सहभाग आढळून आलेला नाही.

(४) सदर प्रकरणात चौकशी केली असता यामध्ये कोणतेही कर्मचारी दोषी आढळून आलेले नाही. मौजा डुमरी, ता.पारशिवणी येथील शेतकी खरेदी विक्री संस्था मर्यादित पारशिवणी या केंद्रावर परप्रांतीय ट्रक आढळून आल्याने सदर संस्थेवर रुपये ५०,०००/- इतका दंड आकारुन जिल्हा मार्केटिंग अधिकारी, नागपूर यांनी वसुली केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरण, महापारेषण व महानिर्मिती वीज कंपन्यांतर्गत अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(११) १३५०६ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तीन वीज कंपन्यांतर्गत सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता, सह तंत्रज्ञांची सुमारे २७ हजार पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमध्ये महानिर्मिती कंपनीतील ११५ कनिष्ठ अभियंते, ४०६ सहाय्यक अभियंते, १४ सिव्हील ज्युनियर इंजिनिअर, १०१ सिव्हील असिस्टंट इंजिनिअर सह १३१७ तंत्रज्ञ पदे, महापारेषण कंपनी मधील १२०३ तंत्रज्ञांसह ११९ सिव्हील इंजिनिअर, १४० विद्युत अभियंते, महावितरण कंपनीमध्ये २३ हजार ७२ तंत्रज्ञ पदे, सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता यांची ६४० पदे व सिव्हील विभाग ७० पदे या पदांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यांस, बहुतांश अभियंते, आय.टी.आय. प्रशिक्षित युवा, प्रकल्पग्रस्त, अनुकंपाग्रस्त बेरोजगार असल्याने त्यांना रोजगार मिळावा या हेतूने शासनाने ही रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. सद्य:स्थितीत महानिर्मिती कंपनीमध्ये सहाय्यक अभियंता या पदाची २१३ पदे, कनिष्ठ अभियंता या पदाची १८२ पदे आणि तंत्रज्ञ-३ ची १३०४ पदे रिक्त आहेत. महापारेषण कंपनीच्या आस्थापनेवर कनिष्ठ अभियंत्याची पदे मंजूर नाहीत. महापारेषण कंपनीतील सहाय्यक अभियंता व सहाय्यक तंत्रज्ञांची एकूण २४८५ पदे रिक्त आहेत. महावितरण कंपनीमध्ये मे २०२२ अखेर सहाय्यक अभियंता ५८३ पदे, कनिष्ठ अभियंता ५३० पदे, सिव्हील विभाग १०४ पदे व तंत्रज्ञ २६३५९ पदे अशी एकूण २७५७६ पदे रिक्त आहेत.

(३) महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपन्यांकडून पदोन्नती व सरळसेवा भरतीची रिक्त पदे नियमानुसार, शासन निर्णयानुसार आणि न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन आवश्यकतेनुसार भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात २५०० मेगावॉट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा प्रस्तावाबाबत

**(१२) १३५२६ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अल्ट्रा मेगा नवीकरणीय ऊर्जा पार्क योजनेच्या पर्याय क्रमांक ८ च्या माध्यमातून महानिर्मिती कंपनीद्वारे नॅशनल थर्मल पॉवर कार्पोरेशन समवेत संयुक्त उद्यम कंपनीच्या माध्यमातून २५०० मेगावॅाट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तदनुषंगाने महानिर्मिती व एनटीपीसी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि सद्य:स्थिती काय आहे तसेच सदरहू प्रस्तावाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदरहू ऊर्जा प्रकल्प उभारावा यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-१०-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) राज्यात केंद्र शासनाच्या अल्ट्रा मेगा नवीकरणीय ऊर्जा पार्क योजनेच्या पर्याय क्र.८ च्या अंतर्गत महानिर्मिती कंपनी व नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन यांच्यात संयुक्त उद्यम कंपनी स्थापन करून २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभाण्याच्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप खालीलप्रमाणे आहे:- नॅशलन थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लि. (किंवा त्याचे सहाय्यक/सहयोगी कंपनी) ह्या केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमासमवेत महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीव्दारा अनुक्रमे ५०:५० या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करून संयुक्त उद्यम कंपनी स्थापन करण्यात येणार आहे. संयुक्त उद्यम कंपनीच्या अभिलेख्याची मागणी करणे व राज्य शासनाच्या अपारंपारिक ऊर्जा धोरणाशी सुसंगत अशा बाबींचे पालन करण्यासाठी योजनेच्या तरतूदीनुसार शासनाव्दारे समिती गठीत करण्यात येणार असून या प्रस्तावांतर्गत उभारण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी संयुक्त उद्यम कंपनीव्दारे ७०:३० अथवा ८०:२० या प्रमाणात कर्ज व भागभांडवल असा निधी उभारण्यात येणार आहे. सौर ऊर्जा पार्क मधील प्रकल्प धारकांकडून One time

upfront fee आणि वार्षिक संचलन व देखभाल शुल्क इ. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुज्ञेय राहतील. सदर योजनेची वैधता मार्च, २०२४ पर्यंत असल्याने प्रस्तावाधीन २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प सदर कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(४) याबाबतच्या प्रस्तावास दिनांक १ जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सांगली कोल्हापूर-सातारा-सोलापूर या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात माती काम करणारे कुंभार कारागीर मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(१३) १३५४९ (३०-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सांगली कोल्हापूर-सातारा-सोलापूर या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात माती काम करणारे कुंभार कारागीर असून अनेक मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याने ते आर्थिक विवंचनेत असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२० च्या तिसऱ्या आठवड्यात त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मातीपासून भांडी कुंड्या पणत्या, चहाचे कुल्हड आणि इतर शोभेच्या वस्तू हे कुंभार कारागीर बनवतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माती काम करणारे कारागीर व दगडी काम करणारे मूर्तिकार, पाथरूड यांना माती व दगडाच्या रॉयल्टी मधून सुट देण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावास मंजुरी देऊन माती काम करणाऱ्या कारागीर व दगडी मूर्ती तयार करणाऱ्या कामगारांना रॉयल्टी मधून सुट देणेबाबत व इतर मूलभूत सुविधा पुरवविणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०७-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) कुंभार समाजातील व्यक्तिंना पारंपारीक व्यवसायासाठी वर्षाला ५०० ब्रास मर्यादेपर्यंत माती उत्खननासाठी व वडार समाजातील पिढीजात हाताने दगडफोडीचा व्यवसाय करीत असलेल्या कुटुंबास त्याच्या व्यवसायाच्या प्रयोजनासाठी स्फोटके वापरून अथवा स्फोटकाशिवाय वर्षाला २०० ब्रास मर्यादेपर्यंत दगड उत्खननासाठी स्वामित्वधन न आकारता नियमानुसार परवाने देण्याची तरतूद शासनाने केलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाविजवितरण कंपनीत सरळसेवा भरती प्रक्रियेत प्रवर्गनिहाय सामाजिक समांतर आरक्षण तरतूदीचे पालन करण्यात न आल्याबाबत

**(१४) १३५९० (३०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **संसदीय कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनींतर्गत सन २०१९ मध्ये सरळसेवा भरतीद्वारे विद्युत सहायक पदभरतीकरीता सेवायोजन जाहिरात क्रमांक ०४/२०१९ नुसार विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जाहिरातीमध्ये पदभरती प्रक्रियेत प्रवर्गनिहाय सामाजिक/ इतर तरतूदीबरोबरच महिला, खेळाडू, माजी सैनिक, शिकाऊ उमेदवार, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त इत्यादीकरीता समांतर आरक्षणाची तरतूद लागू करण्यात आली होती व त्याकरीता जागा आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्यक्ष भरती प्रकिया करतांना समांतर आरक्षण तरतूदीचे तंतोतंत पालन करण्यात आले नसल्याचे प्रसिध्द झालेल्या नियुक्त उमेदवारांच्या यादीवरून निदर्शनास आले व तशा आशयाच्या तक्रारीही केल्या जात असल्याने शासन या भरती प्रक्रियेची चौकशी करून सुधारित यादी प्रसिध्द करणार आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये सन २०१९ मधील सरळसेवा भरतीद्वारे समान आरक्षण तरतूदीनुसार प्रसिध्द झालेल्या नियुक्त उमेदवारांच्या भरतीप्रक्रियेची चौकशी करुन उमेदवारांची सुधारित यादी प्रसिध्द करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१४-१०-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३/०८/२०१४ चे परिपत्रक व दिनांक १९/१२/२०१८ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करण्याबाबतच्या दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार महावितरण कंपनीमधील विद्युत सहायक पदाची निवड यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

महावितरण कंपनीमध्ये पूर्वीपासून समांतर आरक्षणाशिवाय गुणवत्तेनुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात येते व जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या प्रवर्गनिहाय पदांच्या जास्तीत जास्त ५०% इतकी प्रतिक्षा यादी तयार करण्यात येते.

प्रतिक्षा यादीमध्ये समांतर आरक्षणाचा विचार होऊन प्रतिक्षा यादी सुधारित करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र. २७६७/२०२२ दाखल झाली असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरण कंपनीद्वारा शासनाची परवानगी न घेता मोबाईल टॉवरचे वीज शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) माफ करण्यात आले असल्याबाबत

**(१५) १३५९७ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनीद्वारा मोबाईल टॉवर्स कडून घेण्यात येणारे ७.५ टक्के वीज शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) माहे जुलै, २०२१ पासून घेण्यात आलेले नसून ते माहे जुलै, २०२१ रोजी वा त्यादरम्यानपासून माफ करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने सदर मोबाईल टॉवर्सचे वीज शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) माफ केले असल्यास त्यासाठी शासनाची परवानगी घेतली आहे काय,
(३) असल्यास, महावितरण कंपनी तोट्यात असतानाही वीज शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) माफ करण्याची किंवा माहे जुलै, २०२१ रोजी पासून सदर वीज शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) न घेण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, महावितरणची सद्य:आर्थिक स्थिती पहाता माहे जुलै, २०२१ पासून वीज शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) अदा न केलेल्या मोबाईल टॉवर्स कडून थकीत वीज शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) वसुल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०२२) :** (१) विदर्भ व मराठवाड्यातील मोबाईल टॉवर्स कडून घेण्यात येणारे ७.५ टक्के वीज शुल्क (इलेक्ट्रीसिटी डयुटी) माहे ऑगस्ट, २०२१ पासून महावितरण कंपनी द्वारा चुकीने माफ करण्यात आले आहे.
(२) व (३) शासन निर्णय क्र.साप्रोयो-२०१८/प्र.क्र. २५२/उद्योग-८, दिनांक २८/०५/२०१९ नुसार दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंत विदर्भ व मराठवाडा क्षेत्रातील सर्व औद्योगिक ग्राहकांना विद्युत शुल्क माफी असल्याने त्यानुसार शासन अधिसुचना क्र.साप्रोयो-२०१८/प्र.क्र.१५३/ऊर्जा-१, दिनांक १ ऑगस्ट, २०१९ अन्वये विदर्भ व मराठवाडा क्षेत्रातील सर्व उद्योग घटकांना विद्युत शुल्क माफी देण्यात आली. त्याप्रमाणे मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या औद्योगिक वीजदर (Industrial Tariff) वर्गवारीमध्ये समावेश असलेल्या मोबाईल टॉवर्स या वर्गवारीतील ग्राहकांनाही विद्युत शुल्क माफी लागू झाली.
(४) मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या निर्देशानुसार मोबाईल टॉवर्स ग्राहकांना माहे फेब्रुवारी, २०२२ पासून विद्युत शुल्क आकारणी पूर्ववत करण्यात आली आहे आणि अशा ग्राहकांची माहे जुलै, २०२१ ते जानेवारी, २०२२ पर्यंत माफ झालेली विद्युत शुल्काची रक्कम रुपये ४१.४७ कोटी माहे फेब्रुवारी, २०२२ च्या वीज देयकात एक रकमी आकारुन वसुल करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाशी संलग्न सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये हृदयविकार शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेले नवीन "कॅथलॅब" संयंत्र बसविण्याबाबत

**(१६) १३६२१ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाशी संलग्न सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये हृदयविकारावरील शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेले "कॅथलॅब" संयंत्र सन २०१२ मध्ये बसविण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयामध्ये बसविण्यात आलेले कॅथलॅब संयंत्र हे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये कालबाह्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये हृदयविकार शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेले ‘‘कॅथलॅब’’ संयंत्र नवीन बसविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१४-१०-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर या संस्थेस डीजीटल कॉर्डीयॅाक कॅथलॅब (मॉनोप्लेन) ०१ नग या यंत्राची खरेदी प्रक्रिया हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कामठी (जि.नागपूर) तालुक्यात तसेच राज्यातील अन्य जिल्ह्यात अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(१७) १३६२६ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामठी (जि.नागपूर) तालुक्यात तसेच राज्यातील अन्य जिल्ह्यात माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान अवकाळी पाऊस व गारपिट होवून रब्बी पीक हंगामातील शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतीचे सर्वेक्षण व पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२२/ प्र.क्र.८/म-३, दिनांक ०८/०८/२०२२ अन्वये माहे नोव्हेंबर, २०२१ ते मे, २०२२ या कालावधीत गारपीट व अवेळी झालेल्या पावसामुळे शेतीपिकांच्या तसेच मालमत्तेच्या नुकसानीसाठी बाधितांना मदत देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त, नागपूर यांचेमार्फत नागपूर जिल्हाकरीता रुपये ५७८.२४ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कनिष्ठ अधिव्याख्यातांच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(१८) १३७१८ (२५-०८-२०२२) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कनिष्ठ महाविद्यालय/संस्थामध्ये घड्याळी तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या कनिष्ठ अधिव्याख्यातांच्या मानधनात अद्याप वाढ न झाल्याची बाब माहे मे, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कनिष्ठ अधिव्याख्यातांच्या मानधनात वाढ करणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कनिष्ठ महाविद्यालये/ संस्थामध्ये घड्याळी तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या कनिष्ठ अधिव्याख्याता यांना प्रदान करावयाच्या मानधनाच्या दरात दिनांक २२/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधितांना मानधन अदा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दुधाला उसाच्या एफआरपी प्रमाणे हमीभाव देणेबाबतचा निर्णय घेण्याबाबत

**(१९) १३७४५ (३०-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक ११८८४ ला दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध उत्पादनाच्या प्रमाणात सहकारी व खाजगी दूध व्यवसायांकडून अत्यंत कमी दूध दर दिला जात असून दुधाकरीता खाजगी क्षेत्राकडून दूध उत्पादकांना देण्यात येणाऱ्या खरेदी दरावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दूधाच्या विविध ब्रॅन्डच्या विक्रीच्या दरामध्ये वितरक व तत्सम संस्थांना संबंधित दूध विकास प्रकल्प धारकांकडून प्रलोभन दाखविण्यात येऊन दुधाच्या ब्रॅन्डचा खप वाढविण्याकरीता विविध मार्ग अवलंबिण्यात येत आहे, दुधाला दरवाढ देण्याबाबत राज्यात अनेक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २५ जून, २०२१ रोजी मा.दुग्ध विकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रालयामध्ये दुध दरासंदर्भांत बैठक होऊन यामध्ये दुधाला उसाच्या एफआरपी प्रमाणे हमीभाव देणेबाबतचा निर्णय शासन लवकरच घेणार असल्याचे सांगूनही अद्याप शासनाकडून यासंदर्भांत निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुधाला उसाच्या एफआरपी प्रमाणे हमीभाव देणेबाबतचा निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) व (४) मा.मंत्री (दुग्धव्यवसाय) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ जून, २०२१ रोजी झालेल्या बैठकीनुसार दुधाला हमीभाव देण्याच्या अनुषंगाने Maharashtra Regulation of Sugarcane Price (Supplied to Factories) Act, २०१३ या अधिनियमाच्या धर्तीवर राज्यातील दुधाकरीता Maharashtra Regulation of Milk Price (Supplied to Milk Projects/Dairies) Act, २०२१ प्रस्तावित असून प्रस्तावित अधिनियमाची/कायद्याची व्यवहार्यता तपासण्यासाठी शासन निर्णय दिनांक २३ मे, २०२२ अन्वये मंत्रिमंडळाची उपसमिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठामध्ये रक्षक सेक्युरिटी सर्विसेस ॲण्ड सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड पुणे या कंत्राटी सुरक्षा एजन्सीला बेकायदेशीररित्या १६ महिन्यांची मुदतवाढ दिल्याबाबत

**(२०) १३७५१ (३०-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये रक्षक सेक्युरिटी सर्विसेस ॲण्ड सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड पुणे या कंपनीला दिनांक ०१/१२/२०१९ ते ३१/१०/२०२० पर्यंत इ निविदा प्रक्रियेनुसार काम देण्यात आले होते, ही मुदत संपल्यानंतर दिनांक ०१/११/२०२० ते ३१/१२/२०२० दरम्यान नव्याने ई-निविदा काढण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ०१/११/२०२० ते ३१/१२/२०२० दरम्यान काढण्यात आलेल्या इ निविदेमध्ये नियमानुसार एका कंपनीला काम देणे अनिवार्य असताना जाणून बुजून ती निविदा रद्द केली व नंतर फेर निविदा ८ दिवसाच्या आत राबविणे गरजेचे असताना विद्यापीठातून सर्व नियम धाब्यावर ठेवून गेल्या १६ महिन्यांपासून बेकायदेशीररित्या रक्षक सेक्युरिटी सर्विसेसला मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रक्षक सिक्युरिटी सर्विसेस ॲण्ड सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड पुणे या सुरक्षा एजन्सीला कोणत्या निकषाखाली व कोणाच्या मान्यतेने दिनांक ०१/११/२०२० पासून ते ३१/०५/२०२२ पर्यंतची मुदत वाढ देण्यात आली आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, व चौकशीअंती दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०३-१०-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) दिनांक ०१/११/२०२० ते ३१/१२/२०२० दरम्यान काढण्यात आलेल्या ई-निविदेनुसार प्राप्त ३ सुरक्षा एजन्सींची दरपत्रके दिनांक २४/१२/२०२० रोजी उघडण्यात आली. त्यापैकी २ एजन्सींची दरपत्रके विहित नमुन्यामध्ये प्राप्त झाली नसल्यामुळे दर निश्चित करता येत नसल्याने सदर २ सुरक्षा एजन्सींना

अपात्र ठरविण्यात आले होते. दिनांक ०१/०१/२०२१ ते दिनांक ३१/०५/२०२२ पर्यंत ई-निविदेतील अटी व शर्तींमधील अट क्र.१५ मधील तरतुदीस अधीन राहून कुलगुरु यांच्या मान्यतेने कृषी विद्यापीठाकडून मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.